**<u>नि.फौ.ख.क्र.८३/२०१६</u>**
शासन–वि– अमित जगताप
**<u>नि.क्र.४१</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – ज्ञानदेव शिवाजी बागडे,
वय – ५३ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – टिळेकरवाडी, ता. हवेली, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. माझ्या वडीलांच्या नावे टिळेकरवाडी येथे गट क्र.२५२ ही अडीच एकर जमीन होती. सदरची जमीन मी २०११ साली विक्री केली. त्यापैकी मी २० गुंठे जमीन रक्कम रु.१६,००,०००/– ला विकली. मी आरोपीला ओळखतो कारण त्याची जमीन माझ्या शेजारी आहे.

२. आरोपीने मला शेअर मार्केटमध्ये रक्कम डबल करून देतो असे सांगितले. तसेच दर महिन्याला १ लाख रुपये परतावा देईल असे सांगितले होते आणि मूळ रक्कम ही मला गरज असल्यास २ दिवसांत परत देईन असे सांगितले होते. त्यामुळे मी त्याला १७ लाख २० हजार इतकी रक्कम दि.१०/०९/२०११ रोजी महिला बँक येथे दिली. सदरची रक्कम मी त्या बँकेत नेऊन अमित जगताप याला रोखीने दिली होती. त्यावेळी आरोपीने सेक्युरिटी म्हणून मला तीन चेक दिले होते. ते चेक बँक ऑफ महाराष्ट्र शाखा– उरुळी कांचनचे असून रक्कम रु.१,५०,०००/–, ३,७०,०००/– आणि १२,००,०००/– असे होते. आरोपीने सांगितल्यानुसार पैसे अदा केले नाहीत. तसेच त्याने दिलेले चेक बँकेत भरले असता ते न वटता परत आले. ते सर्व चेक मी दोषारोपपत्रासोबत हजर करण्यासाठी पोलीसांना झेरॉक्स कॉपी दिली होती. अस्सलपैकी आज १ चेक रक्कम रु.१२,००,०००/– चा नि.क्र.३९ अन्वये न्यायालयात हजर केलेला आहे. सदरचा चेक हा न वटता परत आल्याबाबत बँकेचा रिटर्न मेमो हजर केलेला आहे. मूळ चेक आणि मूळ रिटर्न मेमो आज मी नि.क्र.४० वर हजर केलेले आहेत. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदरच्या कागदपत्रांना निशाणी देण्यास आरोपींच्या वकिलांनी आक्षेप नोंदविला की, मूळ फिर्यादीच्या ताब्यात दोषारोपपत्र दाखल करतेवेळी असून देखील त्याने ते आधी हजर केलेले नाही. तसेच सदरचा चेक हा फाटलेला असल्यामुळे त्यावरील मजकूर वाचता येत नाही. म्हणून त्यास निशाणी देण्यात येऊ नये.)**

३.		सरकारी वकिल यांचा युक्तिवाद ऐकला. पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दोषारोपपत्रासोबत तीनही चेकची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे व त्याची कॉपी आरोपीला आधीच देण्यात आलेली आहे. आज साक्षीदाराने त्यापैकी एक मूळ चेक आणि रिटर्न मेमो हजर केलेले आहे. सदरचे कागदपत्रांना जनरल क्लॉजेस अॅक्ट नुसार आणि निगोशिएबल इनस्टुमेन्ट अॅक्ट अन्वये ग्रहतक आहे तसेच आज या कागदपत्रांची प्रत आरोपीला देण्यात आली आहे व त्याला त्या कागदपत्रांवरून साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे या कागदपत्रांना निशाणी देण्यात येत आहे. आरोपीने चेक फाटलेला असल्याबाबत घेतलेला आक्षेप हा न्यायनिर्णयाच्या वेळी डिसाईड करण्यात येईल. सबब, चेक आणि रिटर्न मेमो यांस अनुक्रमे **नि.क्र.४२** आणि **नि.क्र.४३** देण्यात येतो.

४.		आरोपीने दिलेले चेक न वटता परत आल्यानंतर आरोपीने फसवणूक केल्याबाबतची फिर्याद पोलीस स्टेशनला जाऊन दिली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४४** देण्यात येतो. तसेच आता मला दाखविण्यात आलेली छापील खबर तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४५** देण्यात येतो. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. साक्षीदाराने आरोपीला आज न्यायालयात ओळखलेले आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे त्याचे विद्वान विधीज्ञ श्री. आर. पी. जाधव यांच्यामार्फत.**

५.		हे म्हणणे खरे आहे की, माझे शिक्षण झालेले असून मला लिहीता–वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला आमच्या व्यवहाराच्या आधीपासून ओळखत होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा स्वतःचे व लोकांचे शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करून व विविध कंपनींचे शेअर विकत घेऊन लोकांचा फायदा करून देतो याची मला आधीपासूनच माहिती होती.माझ्याप्रमाणे इतर गावातील लोकांनी आरोपीला शेअर मार्केटमध्ये लावण्यासाठी दिल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत फिर्याद देण्यापूर्वी आरोपीविरूद्ध कोणताही गुन्हा दाखल नव्हता.

प्रश्न – शेअर मार्केटबद्दल तुम्हाला काही माहिती आहे का ?
उत्तर – मला शेअर मार्केटबद्दल माहिती आहे. सदर व्यवहारापूर्वी देखील मला शेअर मार्केटची माहिती होती.

६.		हे म्हणणे खरे आहे की, शेअर मार्केटमध्ये विविध कंपन्यांचे शेअर विकत घेऊन त्यांच्यामध्ये गुंतवणूक केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, शेअर मार्केटमध्ये कधी

शेअरचे रेट वाढतात तर कधी कमी होतात.

७. हे म्हणणे खरे आहे की, जमीन विक्री करून १६ लाख मिळाल्याबाबत कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.१०/०९/२०११ ला १७ लाख २० हजर रुपये इतकी रक्कम माझ्याकडे होती हे दाखविण्यासाठी कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.४४ वरील चेक न वटता परत आल्यानंतर अंदाजे १७ ते १८ दिवसांच्या उशीराने आरोपीविरूद्ध वादातील फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, चेक बाऊंस झाल्यानंतर आणि फिर्याद दाखल करण्यापूर्वी वादातील चेकची रक्कम आरोपीने परत अदा करावी याबाबत त्याला नोटीस पाठविली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वादातील चेक मला आरोपीने सेक्युरिटी म्हणून फक्त सही व शिक्का करून दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, आर्थिक फायदा मिळावा म्हणून मी स्वतःच्या मर्जीने माझी रक्कम आरोपीकडे गुंतवणूक करण्यासाठी दिलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला १७ लाख २० हजर इतकी रक्कम गुंतवणूक करण्यासाठी दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, रक्कम गुंतवणूक केल्यानंतर काही महिन्यांसाठी आरोपीने मला परतावा दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, काही महिन्यांनंतर शेअरची किंमत कमी झाल्यामुळे आरोपी मला माझ्या रकमेवर परतावा देवू शकला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझी कसल्याही प्रकारे फसवणूक केलेली नाही. उलट मला फायदा मिळावा म्हणून माझी रक्कम शेअर मार्केटमध्ये गुंतवलेली होती.

८. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीतील मजकूर माझ्या म्हणण्यानुसार लिहून घेतल्याचे खात्री करूनच मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, नेमकी कोणत्या तारखेला फिर्याद दिली ती तारीख आज मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या फिर्यादीतील नमूद घटना आणि आज सरतपासात कथन केलेली घटना कधीही घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः– १३.०५.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.

**नि.फौ.ख.क्र.८३/२०१६**
शासन–वि– अमित जगताप
**नि.क्र.४५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – अशोक पांडुरंग जांभुळकर,
वय – ६४ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – सहजपूर, ता. दौंड, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१. मी शेती करतो. आरोपी माझ्या गावचा आहे. आरोपी मला शेअर मार्केटमध्ये पैसे लावण्यासाठी सांगत होता व ती रक्कम ८ टक्के नफ्याने परत मिळेल असे सांगितले म्हणून मी आरोपीला पाऊणेदोन लाख रुपये दिले होते. २ महिने आरापीने मला दरमहा ८ टक्क्याने पैसे परत दिले. परंतु, त्यानंतर टाळाटाळ करण्यास सुरूवात केली. आरोपीने सदर रकमेची सेक्युरिटी म्हणून मला चार चेक दिले होते. ते चेक बँक ऑफ महाराष्ट्र शाखा– उरुळी कांचन मध्ये भरले असता न वटता परत आले. ते चेक मी न्यायालयात हजर केलेले आहेत. आता मला दाखविण्यात आलेला धनादेश क्र.९१६२३६ रक्कम रु.१,००,०००/– चा तोच आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४६** देण्यात येतो. आता मला दाखविण्यात आलेला धनादेश क्र.४०८६७४ रक्कम रु.३०,०००/– चा तोच आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४७** देण्यात येतो. आता मला दाखविण्यात आलेला धनादेश क्र.१५८७३३ रक्कम रु.२०,०००/– चा तोच आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४८** देण्यात येतो. आता मला दाखविण्यात आलेला धनादेश क्र.१५८७५१ रक्कम रु.२५,०००/– चा तोच आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४९** देण्यात येतो. आता मला दाखविण्यात आलेला धनादेश क्र.१५८७३३ चा रिटर्न मेमो आहे. त्यावर बँकेची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५०** देण्यात येतो. आता मला दाखविण्यात आलेला धनादेश क्र.१५८७५१ चा रिटर्न मेमो आहे. त्यावर बँकेची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५१** देण्यात येतो.

२. आरोपीने पैसे देतो म्हणून वेळ काढला. परंतु, पैसे अदा केली नाही म्हणून आरोपीविरूद्ध केस दाखल केली. फिर्याद ही ज्ञानदेव बागडे यांनी दिली होती. पोलिसांनी माझा जबाब माझ्या म्हणण्यानुसार जबाब नोंदविला होता. आरोपीने पैसे देतो असे म्हणून पैसे दिले नाहीत आणि माझी फसवणूक केली.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे त्याचे विद्वान विधीज्ञ श्री. आर. पी. जाधव यांच्यामार्फत.</u>**

३. मला लिहीता–वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि आरोपी एकाच गावचे राहणारे असून मी त्याला आधीपासूनच ओळखत होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी लोकांकडून पैसे घेऊन शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून लोकांचा फायदा करून देतो याची मला माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याप्रमाणे इतर गावातील लोकांनी देखील आरोपीकडे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी पैसे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही केस करण्याआधी आरोपीवर इतर कोणतेही गुन्हे दाखल नव्हते. मला शेअर मार्केटबद्दक काहीच माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला नेमके किती तारखेला किती रक्कम दिली ते मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे त्यावेळी इतकी रक्कम शिल्लक होती हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने किती रकमेचा परतावा दिला त्याबाबत मी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आर्थिक फायद्यासाठी मी आरोपीकडे रक्कम गुंतवणूक करण्यासाठी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४६ ते नि.क्र.४९ वरील चेक हे आरोपीवर गुन्हा दाखल झाल्यानंतर बाऊंस झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, चेक बाऊंस झाल्यानंतर चेकची रक्कम मागणीकरिता वकिलांमार्फत नोटीस पाठविलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझे पैसे परत मिळावेत म्हणून मी पोलीस स्टेशनला जाऊन आरोपीविरूद्ध फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मला दरमहा ८ टक्के नफ्याने पैसे परत देईल हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आणि आरोपीमधील व्यवहाराबाबत कागदोपत्री काहीही झालेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला सेक्युरिटी म्हणून फक्त सही करून कोरे चेक दिले होते.

४. पोलिसांनी माझा जबाब दि.०१.०६.२०१२ रोजी नोंदविला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझी कोणतीही फसवणूक केलेली नाही व मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.

दिनांकः– १३.०५.२०२५

**नि.फौ.ख.क्र.८३/२०१६**
शासन–वि– अमित जगताप
**नि.क्र.५२**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – पांडुरंग बबन म्हेत्रे,
वय – ८६ वर्षे, व्यवसाय – काही नाही,
राहणार – सहजपूर, ता. दौंड, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१. आरोपी माझ्या गावचा आहे. आरोपी मला शेअर मार्केटमध्ये पैसे लावण्यासाठी सांगत होता म्हणून मी रु.२३,५०,०००/– त्याच्या उरुळी कांचन येथील ऑफीसमध्ये दिले होते. आरोपी मला ती रक्कम १० टक्के नफ्याने परत मिळेल असे सांगितले होते. परंतु, आरोपीने मला काहीही पैसे परत दिले नाही आणि त्याने त्याचे ऑफीस बंद करून टाकले. नंतर आरोपी भेटल्यावर त्याच्याकडे पैसे नाहीत असे सांगितले. आरोपीने मला काहीही कागदपत्रे लिहून दिले नव्हते. आरोपीने मला रकमेपोटी सेक्युरिटी म्हणून ७ ते ८ चेक दिले होते. परंतु, ते माझ्या हाताने गहाळ झालेले आहेत. आरोपीकडून पैसे परत मिळावेत म्हणून केस केली होती. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. साक्षीदाराने आज आरोपीला न्यायालयात ओळखलेले आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे त्याचे विद्वान विधीज्ञ श्री. आर. पी. जाधव यांच्यामार्फत.**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला आधीपासूनच ओळखत होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी लोकांकडून पैसे घेऊन शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून लोकांचा फायदा करून देतो याची मला माहिती होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याप्रमाणे इतर गावातील लोकांनी देखील आरोपीकडे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी रुपाली हिने देखील आरोपीकडे गुंतवणूकीसाठी पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला नेमके किती तारखेला पैसे दिले हे मी पोलीसांना देखील सांगितलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे त्यावेळी इतकी रक्कम शिल्लक होती हे दाखविणारा कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला शेअर मार्केटबद्दल काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दिलेली रक्कम आरोपीने कोणत्या शेअर मध्ये गुंतवणूक केली याबाबत मी आरोपीकडे विचारणा केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की,

माझ्या आर्थिक फायद्यासाठी मी आरोपीकडे रक्कम गुंतवणूक करण्यासाठी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडून रक्कम वसूल करून मिळावी यासाठी मी त्याच्याविरूद्ध बारामती येथे दिवाणी दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी माझा जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पैसे मिळावेत एवढाच माझा उद्देश आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा फायदा व्हावा म्हणून आरोपीने पैसे गुंतविले होते म्हणून त्याने माझी फसवणूक केलेली नाही.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष
**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.

दिनांकः– १३.०५.२०२५